# प्रेसनोट

दि. ०४/०१/२०२०

## लघुवाद न्यायालय शिवाजीनगर, पुणे येथील बेलीफास अडीच लाख रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | मनोहर रूद्राप्पा कांबळे, वय ४८ वर्षे, नोकरी - बेलीफ, लघुवाद न्यायालय, शिवाजीनगर, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,५०,०००/- (अडीच लाख रूपये) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,५०,०००/- (त्यामध्ये ३०,०००/- दोन हजार रूपयांच्या चलनी नोटा व २,२०,०००/- दोन हजार रूपयांच्या नकली नोटा) |
| थोडक्यात माहिती. | यातील तक्रारदार यांच्या मिळकतीचा ताबा देण्यासाठी लघुवाद न्यायालय, शिवाजीनगर पुणे यांनी आदेश दिला होता. सदरचा ताबा थांबवून, तक्रारदार यांची त्यामध्ये हरकत नोंदवून मदत करणेसाठी म्हणून तक्रारदार यांचेकडे २,५०,०००/- रूपये (३०,०००/- रूपये, दोन हजार रूपये दराच्या चलनी नोटा व २,२०,०००/- दोन हजार रूपयांच्या नकली नोटा) लाचेची मागणी करून ती पुणे महानगरपालीकेच्या जवळील पेट्रोलपंपाजवळ स्विकारल्यावर त्यास रंगेहात ताब्यात घेण्यात आले आहे. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज - www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in

सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक अँटी करप्शन ब्युरो, पुणे

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट.